2 2 JAN 2026
पुण्यनगरी

# वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या गणित विभागातील रामानुजन सभागृहात सकाळी ११ वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये 'वि. स. खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावर विनोद शिरसाठ, पुणे हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. एम. हिर्डेकर असतील. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. अनंत लाभसेटवार व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

22 JAN 2026

सकाळ

# शहाजी महाविद्यालयात शनिवारी राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. २१ : शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी (ता. २४) भूगोल विभागातर्फे 'भारतातील पायाभूत सुविधा व संसाधने विकास : समस्या, आव्हाने आणि दृष्टिकोन' वर परिषद आहे.

शिवाजी विद्यापीठातील माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांच्या हस्ते, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होईल. डॉ. बी. एन. गोफणे हे परिषदेत बीजभाषक आहेत. डॉ. दीपक कुमार, डॉ. पी. के. रथ मार्गदर्शन करतील. पायाभूत सुविधा, संसाधन विकास यावर पुस्तिका प्रकाशित केली जाईल. संशोधन पेपरचे सादरीकरणही आहे. भूगोल, भूगर्भशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. जाधव यांच्या उपस्थितीत समारोप होईल. भूगोल विभागप्रमुख डॉ. डी. एल. काशीद-पाटील, समन्वयक डॉ. एन. डी. काशीद-पाटील, डॉ. आर. डी. मांडणीकर आयोजक म्हणून काम पाहतील. परिषदेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले आहे.

22 JAN 2026
तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# 'भारतीय संविधान, आजची प्रस्तुतता'वर उद्या जयवंत महाविद्यालयात चर्चासत्र

**इचलकरंजी :** येथील जयवंतराव आवळे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जयवंत महाविद्यालय आणि निर्मिती प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार २३ जानेवारी रोजी भारतीय संविधान आणि आजची प्रस्तुतता यावर आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. भारतीय संविधानाच्या स्वीकृतीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधानिक मूल्यांवर शैक्षणिक पातळीवर सखोल विचारविमर्श व्हावा आणि जनजागृती वाढावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. चर्चासत्राचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलावर जमादार असतील. प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेता डॉ. मिलिंद शिंदे, डॉ. मिलिंद आव्हाड, डॉ. मनीष वाघेला, स्मिता पानसरे उपस्थित राहणार आहेत. समारोप सत्रात शिवाजी विद्यापीठचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. व्ही. एम. पाटील, डॉ. श्रीकृष्ण आडसुळ, डॉ. सुरेश शेळके सहभागी होतील. चर्चासत्रात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वयक डॉ. वैजयंता पाटील, डॉ. वसंत भागवत, डॉ. कपिल राजहंस यांनी केले आहे.

2 2 JAN 2026

सकाळ

# इचलकरंजीत उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

इचलकरंजी ता. २१ : येथे जयवंत महाविद्यालय, निर्मिती प्रकाशन (कोल्हापूर) यांच्यातर्फे शुक्रवारी (ता.२३) 'भारतीय संविधान आणि आजची प्रस्तुतता' विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

भारतीय संविधानाच्या स्वीकृतीचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. यानिमित्त संविधानिक मूल्यांचा शैक्षणिक पातळीवर विचारविमर्श व्हावा आणि संविधानाविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने चर्चासत्राचे आयोजन केले आहे. उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते सकाळी साडेनऊ वाजता होईल. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलावर जमादार आहेत. अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे, दिल्ली येथील डॉ. मिलिंद आव्हाड, गुजरात येथील डॉ. मनीष वाघेला आणि अहिल्यानगर येथील स्मिता पानसरे उपस्थित राहतील.

22 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई-कन्टेन्ट निर्मितीत आवाज व व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे : तुषार भद्रे

कोल्हापूर/प्रतिनिधी : आजच्या बदलत्या जीवनशैलीत केवळ तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे पुरेसे नसून स्वतःला माणूस असणे हेच सर्वात महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी व उच्चारशास्त्र तज्ज्ञ श्री. तुषार भद्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेअंतर्गत विविध विद्याशाखांच्या अध्यापन व अध्ययनासाठी "इंटरॲक्टिव्ह ई-कन्टेन्ट विकसन" या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेतील पहिल्या सत्रात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे पीएम-उषा योजनेचे नोडल अधिकारी प्रा. डॉ. गोविंद कोळेकर उपस्थित होते. यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक डॉ. [illegible] पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे, सहा. कुलसचिव डॉ. दिलीप मोहाडीकर, समन्वयक डॉ. पांडुरंग बेडगर तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. भद्रे पुढे म्हणाले की, ज्यांचा आतला आवाज प्रामाणिक असतो, त्यांचा बाहेरचा आवाजही प्रभावी असतो. जीवनात कोणतेही तंत्र वापरले तरी त्यामागील पारदर्शकता आणि भावनिक प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. श्वास आणि आवाज हे माणसाच्या जीवनाचे केंद्रबिंदू आहेत. स्वतःच्या आवाजावर प्रेम करणे, स्वतःची ओळख निर्माण करणे आणि कोणते विचार स्वीकारायचे व कोणते नाकारायचे हे ठरविणे आवश्यक आहे.

दुःख आणि आनंद या दोन्ही भावना समजून घेत जीवनातील प्रत्येक क्षण आनंदाने जगायला शिका. भावनेची भाषा समजणे ही माणूस म्हणून आपली मूलभूत गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. गोविंद कोळेकर म्हणाले की, पीएम-उषा योजनेच्या माध्यमातून शिक्षकांना गुणवत्तापूर्ण ई-कन्टेन्ट निर्मितीसाठी प्रशिक्षण दिले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावी व सुसंगत शिक्षण पोहोचविणे शक्य होत असून या प्रयत्नात दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना संचालक डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, ई-कन्टेन्ट निर्मितीत आवाज हा केवळ तांत्रिक घटक नसून तो शिकण्याचा अनुभव समृद्ध करणारा माध्यम आहे. विद्यार्थ्यांपर्यंत परिणामकारक शिक्षण पोहोचविण्यासाठी स्पष्ट, भावपूर्ण आणि शुद्ध आवाजातील ई-कन्टेन्ट आवश्यक असल्यानेच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.




कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. वहीदा मकानदार यांनी केले, तर पाहुण्यांची ओळख [illegible] यांनी करून दिली. आभार उपकुलसचिव श्री. विनय शिंदे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2026
पुण्यनगरी

# ई-कंटेंट निर्मितीत आवाज व व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे

## – तुषार भद्रे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या बदलत्या जीवनशैलीत केवळ तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे पुरेसे नसून चांगला माणूस असणे हेच सर्वांत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी व उच्चारशास्त्रतज्ज्ञ तुषार भद्रे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत विविध विद्याशाखांच्या अध्यापन व अध्ययनासाठी 'इंटरॲक्टिव्ह ई-कंटेंट विकसन' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेतील पहिल्या सत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे



पीएम-उषा योजनेचे नोडल अधिकारी प्रा. डॉ. गोविंद कोळेकर होते.

तुषार भद्रे म्हणाले, ज्यांचा आतला आवाज प्रामाणिक असतो, त्यांचा बाहेरचा आवाजही प्रभावी असतो. जीवनात कोणतेही तंत्र वापरले तरी त्यामागील परफॉर्मन्स आणि भावनिक प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. श्वास आणि आवाज हे माणसाच्या जीवनाचे केंद्रबिंदू आहेत. स्वतःच्या आवाजावर प्रेम करणे, स्वतःची ओळख निर्माण करणे आणि कोणते विचार स्वीकारायचे व कोणते नाकारायचे, हे ठरवणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. गोविंद कोळेकर म्हणाले, पीएम-उषा योजनेच्या माध्यमातून शिक्षकांना गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट निर्मितीसाठी प्रशिक्षण दिले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावी व सुसंगत शिक्षण पोहोचविणे शक्य होत असून, या कार्यात दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना संचालक डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांपर्यंत परिणामकारक शिक्षण पोहोचविण्यासाठी स्पष्ट, भावपूर्ण आणि शुद्ध आवाजातील ई-कंटेंट आवश्यक असल्यानेच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी 'महावीर'चे प्रा. डॉ. बाळगोंड पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे, सूत्रसंचालन डॉ. नगीना माळी यांनी केले, तर पाहुण्यांची ओळख प्रियांका सुर्वे यांनी करून दिली. आभार उपकुलसचिव विनय शिंदे यांनी मानले.

22 JAN 2026

जनप्रवास



कोल्हापूर : विद्यापीठातील आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद, प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. सुभाष माने, डॉ. गजानन राशिनकर आदी.

# विद्यापीठात लक्षवेधी पेटंटची गॅलरी

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आजपासून सुरू झालेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेमध्ये विशेष औद्योगिक प्रदर्शन आणि पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने पाच वर्षांत प्राप्त बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधक ठरली.

विद्यापीठात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या प्रदर्शन-स्पर्धेचे फीत कापून उद्घाटन केले. उद्घाटनानंतर डॉ. जाधव यांनी प्रदर्शनाची पाहणी केली. त्याचप्रमाणे सहभागी उद्योजक-व्यावसायिकांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याविषयी तसेच आवश्यक तेथे मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी सूचित केले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत गतवर्षीप्रमाणे यंदाही अनेक स्थानिक उद्योजक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. २० स्टॉल असून यामध्ये डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) कक्षाच्या वतीने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठाने प्राप्त केलेल्या विविध पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरीही मांडली आहे. ही प्रमाणपत्रे पाहण्यासाठी जिज्ञासू संशोधक विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली. ही गॅलरी अभिनव आणि दर्जेदार संशोधनासाठी प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास डॉ. राशिनकर यांनी व्यक्त केला. याखेरीज वीज बचत उपकरणे, औद्योगिक उपकरणे, सौर उपकरणे, आधुनिक लॉकर्स, कॉफी विथ सी.ए., स्टार्च थ्री-डी प्रिंटींग, सेंद्रिय खाद्यपदार्थ इत्यादींचेही स्टॉल आहेत. पोस्टर प्रदर्शनात इंजिनिअरिंग व फॅब टेक, आय.टी. व इमर्जिंग टेक्नॉलॉजी, सोशिओ-मॅनेजमेंट व फिट-टेक, सस्टेनेबिलिटी व हेल्थ या चार गटांमध्ये सुमारे शंभर पोस्टर संशोधक विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केले. दरम्यान मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुस्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी.वाय. पाटील वैद्यकीय विद्यापीठाचे डॉ. देवव्रत हर्षे, 'सिरी'चे सहसंस्थापक सचिन कुंभोज, ग्लोबल फायनान्सचे संस्थापक संचालक योगेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

2 2 JAN 2026

पुण्यनगरी



# मंडलिक महाविद्यालयात कौशल्य विकास कार्यशाळा

**मुरगूड :** येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत 'एम्प्लॉयबिलिटी स्किल फॉर सायन्स ग्रॅज्युएटस् अंडर एनईपी २०२०' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेसाठी बिद्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय पाटील प्रमुख पाहुणे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात दूधसाखर महाविद्यालय, बिद्रीचे प्रा. राजेंद्र चोपडे, द्वितीय सत्रात कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटीचे डॉ. सागर व्हनाळकर यांनी भाष्य केले. यावेळी प्रा. डॉ. शिवाजी पोवार, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. डॉ. पांडुरंग फराकटे, प्रा. सूरज मांगले, प्रा. मयूर कांबळे, प्रा. विनायक माने, प्रा. प्रीतम गायकवाड, प्रा. सोनाली कुराडे, प्रा. माधुरी कुदळे, प्रा. शिल्पा कुडवे, प्रा. स्नेहा हवालदार, प्रा. अश्विनी गुजर, प्रा. तेजस्विनी कांबळे, प्रा. वैशाली कांबळे, प्रा. समृद्धी मोरे, प्रा. आदिती बांबरे, सतीश खराडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
22 JAN 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ६०२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बुधवारअखेर झालेल्या परीक्षांपैकी ६०२ परीक्षांचे निकाल जाहीर झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने देण्यात आली. बुधवारी (दि. २१) अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये समाजकार्य पदव्युत्तर पदवी (सत्र तिसरे व चौथे), अभियांत्रिकी पदवी (सत्र पाचवे व सहावे), समाजकार्य पदव्युत्तर पदवी (सत्र पहिले व दुसरे), तंत्रज्ञान विषयातील विज्ञान पदव्युत्तर पदवी (विविध अभ्यासक्रम संकेतांकांसह सत्र पहिले ते सहावे), भौतिक रसायनशास्त्र विषयातील विज्ञान पदव्युत्तर पदवी (सत्र तिसरे व चौथे), सामान्य सूक्ष्मजीवशास्त्र विषयातील विज्ञान पदव्युत्तर पदवी (सत्र तिसरे), वाणिज्य पदव्युत्तर पदवी (सत्र पहिले व दुसरे) तसेच भौतिकशास्त्र विषयातील विज्ञान पदव्युत्तर पदवी (सत्र तिसरे व चौथे) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

22 JAN 2026
तरुण भारत



# ६०२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील बुधवारी २३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. आजअखेर एकूण ६०२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात झाले आहेत. बुधवारी विविध ६८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ९४ परीक्षा केंद्रावर झाल्या. सदर परीक्षांसाठी ९२१२ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक-परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
22 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीच्या विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण आवश्यक : खोरे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

साताराची प्रतिसरकार चळवळ ही आदर्श राजनीतीचे प्रतीक होते. या सर्व चळवळीची प्रेरणा ही स्वातंत्र्याची व सामाजिक समतेची होती. साम्राज्यवादास पर्यायी व्यवस्था म्हणून ही चळवळ उभी राहिली. फिल्डमार्शल जी. डी. बापू लाड यांतील एक प्रमुख होते. पर्यायी समाजाचे चित्र जी. डी. बापूंच्या जीवनदृष्टीत होते. आजच्या लोकशाहीच्या व्यापक विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठातील 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन' आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. बापू लाड' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

खोरे म्हणाले, या चळवळीला वैचारिक भूमी होती. न्यायदान व सावकारमुक्ती हे दोन महत्त्वाचे घटक होते. संघटनात्मक कार्याचे प्रारूप म्हणून याकडे अभ्यासकांनी पाहायला हवे. किंबहुना प्रतिसरकार चळवळीचे दस्तऐवजीकारण होणे गरजेचे आहे. भूमिगत चळवळ ही सामान्य माणसांचा आवाज होती. लोकशाहीचा विचार केंद्रस्थानी ठेवून ती राबवली जात होती. आता मात्र आजच्या स्थितिगतीने या कार्याचा विचार व्हायला हवा. त्यासाठी सामाजिक दुवे मांडणे गरजेचे आहे. या चळवळीमागे तत्कालीन महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास व संसदीय लोकशाहीचा संदर्भ आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, सामान्यातला सामान्य नागरिक दोन घास सुखाने खावा या हेतूने प्रतिसरकारची चळवळ उभी राहिली. स्वराज्यातून सुराज्य हे या चळवळीचे स्वप्न होते. बापूंनी मराठवाडा मुक्ती संग्रामात महत्त्वाचे योगदान दिले. प्रतिसरकार चळवळीतील अनेक दुवे अजूनही दुर्लक्षित आहेत. त्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. विष्णू पावले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. एस. डुबल, डॉ. नवनाथ गुंड, प्रा. भारती पाटील, प्रा. अवनिश पाटील, एम.ए.चे व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

बोलीभाषेविषयी त्या भागांत संबंधित बोलीभाषेचा उत्सव साजरा केला जावा. त्यासाठी शासन आणि विद्यापीठांनी संयुक्तपणे कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. (Dialect workshop at Shivaji University)

## चंदगडी बोलीवर कानडी, बेळगावी मराठी, गोमंतकीय कोकणीचा प्रभाव

'चंदगडी बोलीचे स्वरुप' या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. चंदगडी माणूस हा निर्मळ, स्वाभिमानी आणि सडेतोड स्वभावाचा असल्यामुळे स्वाभाविकच त्याची भाषा ही राकट आहे. या भाषेत लिंगभेद आढळत नाही. प्रत्येक विधी, सण, उत्सव यांचे लोकगीतांतून मोठे साजरीकरण होते. आता नव्या पिढीमध्ये हे सारे अस्तंगत होताना दिसते. जर ही बोलीभाषा टिकवावयाची तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

## कोल्हापुरी बोलीत मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा

डॉ. एकनाथ आळवेकर 'कोल्हापुरी बोली' या विषयावर बोलताना म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकचा सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ती बोलली जाते. इथला भूमीपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते. एकाचवेळी रांगडा लवंगी मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा हे त्याच्या भाषेचे वैशिष्ट्य आहे. शंकर पाटील, महादेव मोरे, डॉ. आनंद यादव, डॉ. राजन गवस, डॉ. चंद्रकुमार नलगे, कृष्णात खोत आणि किरण गुरव इत्यादी लेखकांच्या साहित्यामधून कोल्हापुरी बोली निरनिराळ्या ढंगाने वाचकांना सामोरी येते. उच्चारणातील आक्रमकता, स्त्रियांच्या बोलण्यातील क्रियापदांचा वापर आणि कृषीसंस्कृतीचा स्वाभाविक प्रभाव ही या बोलीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्याचप्रमाणे शहरी भागामध्ये इंग्रजी शब्दांचे सुलभीकरण करून त्यांचा सहजगत्या नित्य बोलण्यात केला जाणारा वापर हेही कोल्हापुरी बोलीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणांतून कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींमधील शब्द, वाक्प्रचार आणि म्हणींची अनेक उदाहरणे देऊन ही माहिती रंजकरित्या सादर केली. (Dialect workshop at Shivaji University)

## बोलीभाषांचा शब्दकोष निर्माण करण्याचा प्रयत्न

यावेळी मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील बोली भाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी बोलीभाषा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्याचप्रमाणे विविध बोलीभाषांचे शब्दकोष निर्माण करण्याच्या दृष्टीनेही शासन गांभीर्यपूर्वक प्रयत्न करीत आहे. नवतंत्रज्ञानाचा, समाजमाध्यमांचा वापर करून नव्या पिढीने आपल्या बोली भाषेला लोकमान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## बोलीभाषा ही आपली खरी मातृभाषा

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, बोलीभाषा ही आपली खरी मातृभाषा आहे, हे लक्षात घेऊन आपण तिचा सन्मान करण्यास शिकले पाहिजे. भाषा हे लोकांमध्ये जवळीक साधण्यासाठीचे महत्त्वाचे साधन आहे. भाषा प्रवाही राहण्यासाठी अन्य भाषांतील शब्दांचा मुक्तप्रवेश आपण स्वीकारला पाहिजे. बोलीभाषांचे शब्दकोष निर्माण होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## चंदगडी लोककलाकारांचे श्रवणीय सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी (ता. चंदगड) येथील तुळसाबाई बांदिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. विशेषतः चंदगड भागातील विवाहादरम्यान जे विविध विधी केले जातात, त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या विविध लोकगीतांचे सादरीकरण करण्यात आले. या कलाकारांत सरिता विष्णू गावडे, सुनिता गोविंद भादवणकर, गुंडाबाई बाळू गावडे, शांता महादेव बांदिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनिता गावडे आणि शांता दत्तू गावडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमास मराठी भाषा विभागाचे भाषा अधिकारी अजित पोवार, वरिष्ठ अनुवादक मुकुंद गोरे, अधीक्षक नारायण जायभाये, नितीन यशवंतराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

22 JAN 2026

# बोलीभाषांना सार्वत्रिक सन्मान निर्माण होण्याची गरज; 'बोलींचा जागर' कार्यशाळेतील सूर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रतिनिधी January 21, 2026 0



oplus_2

**कोल्हापूर : प्रतिनिधी :** बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सार्वत्रिक सद्भाव आणि सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर' या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये उमटला.

महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत 'बोलींचा जागर' ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा आणि चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण झाले. (Dialect workshop at Shivaji University)

मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे आणि डॉ. एकनाथ आळवेकर या तज्ज्ञांनी सहभाग दर्शविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

## बोलीभाषेचा उत्सव साजरा करण्याची गरज

यावेळी 'चंदगडी बोली: उद्गम आणि विकास' या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो आणि त्यातूनच पुढे भाषिक सपाटीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात होते. या पेरलेल्या न्यूनगंडातून आजवर अनेक बोलीभाषा अस्तंगत झाल्या, तथापि आता त्यांच्या जतनासाठी शासनाने पुढाकार घेतला, ही स्वागतार्ह बाब आहे. बोलीभाषा ही आपल्या अस्तित्वाचे कारण आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर होऊन बोलीभाषेविषयी, प्रेम, आदर आणि सद्भाव जागृत करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्या दृष्टीने ज्या त्या भागातील

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2026 जनप्रवास

# बोली भाषांविषयी सार्वत्रिक सन्मान निर्माण होण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठातील 'बोलींचा जागर' कार्यशाळेतील सूर

**जनप्रवास : कोल्हापूर**

बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सार्वत्रिक सद्भाव आणि सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर' या कार्यशाळेमध्ये उमटला.

महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत आयोजित 'बोलींचा जागर' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. यात कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींचे सादरीकरण झाले. मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत, सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून या कार्यक्रमाचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, न्यूनगंडातून अनेक बोलीभाषा अस्तंगत झाल्या, आता त्यांच्या जतनासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मनातील न्यूनगंड दूर होऊन बोलीभाषेविषयी, प्रेम, आदर आणि सद्भाव जागृत करावी. डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो. तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. प्रत्येक विधी, सण, उत्सवांत लोकगीतांना महत्व आहे. डॉ. एकनाथ आळवेकर म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना डॉ. पवार.

ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकचा सीमाभाग आदी ठिकाणी बोलली जाते. एकाचवेळी रांगडा लवंगी मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा हे भाषेचे वैशिष्ट्य आहे. डॉ. संजय पवार म्हणाले, महाराष्ट्रातील बोली भाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी बोलीभाषा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. नवतंत्रज्ञानाचा, समाजमाध्यमांचा वापर करून नव्या पिढीने आपल्या बोली भाषेला लोकमान्यता मिळवून द्यावी. अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, भाषा हे लोकांमध्ये जवळीक साधण्यासाठीचे साधन आहे. बोलीभाषांचे शब्दकोष निर्माण होणे महत्त्वाचे आहे. स्वागत व प्रास्ताविक प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी डॉ. अजित पवार, मुकुंद गोरे, नारायण जायभाये, नितीन यशवंतराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर होते.

22 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बोलीभाषांविषयी सार्वत्रिक सन्मान निर्मितीची गरज

## शिवाजी विद्यापीठातील 'बोलींचा जागर' कार्यशाळेत सूर

कोल्हापूर : प्रतिनिधी

बोलीभाषा टिकवण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सार्वत्रिक सद्भाव आणि सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर बुधवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर' या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये उमटला.

महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत 'बोलींचा जागर' ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

यावेळी 'चंदगडी बोली : उद्गम आणि विकास' या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे



म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो आणि त्यातूनच पुढे भाषिक सपाटीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. या पेरलेल्या न्यूनगंडातून आजवर अनेक बोलीभाषा अस्तंगत झाल्या. तथापि, आता त्यांच्या जतनासाठी शासनाने पुढाकार घेतला, ही स्वागतार्ह बाब आहे.

'चंदगडी बोलीचे स्वरूप' या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो, तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. जर ही बोलीभाषा टिकवायची असेल तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. एकनाथ आळवेकर म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकच्या सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ती बोलली जाते. इथला भूमिपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते. एकाच वेळी रांगडा, लवंगी मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा हे त्याच्या भाषेचे वैशिष्ट्य आहे. शंकर पाटील, महादेव मोरे, डॉ. आनंद यादव, डॉ. राजन गवस, डॉ. चंद्रकुमार नलगे, कृष्णात खोत, किरण गुरव इत्यादी लेखकांच्या साहित्यामधून कोल्हापुरी बोली निरनिराळ्या ढंगाने वाचकांना सामोरी येते.

मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील बोलीभाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी बोलीभाषा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

कार्यक्रमास मराठी भाषा विभागाचे भाषा अधिकारी अजित पोवार, वरिष्ठ अनुवादक मुकुंद गोरे, अधीक्षक नारायण जाधव, नितीन यशवंतराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी, तर प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

### चंदगडी लोककलाकारांचे श्रवणीय सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी (ता. चंदगड) येथील तुळसाबाई वादिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. विशेषतः चंदगड भागातील विवाहादरम्यान जे विधिविधी केले जातात, त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या विविध लोकगीतांचे सादरीकरण करण्यात आले. या कलाकारांत सरिता विष्णू गावडे, सुनीता गोविंद भादवणकर, गुंडाबाई बाळू गावडे, शांता महादेव वादिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनीता गावडे आणि शांता बाबू गावडे यांचा समावेश होता.

22 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिंधुदुर्ग समाचार

epaper : www.sindhudurgsamachar.com
Maharashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम
कोल्हापूर
Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

• गुरुवार दि.२२ जानेवारी २०२६ • भाग ३ • वर्ष ३५ • अंक ३२१ • कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिद्ध • e-mail: ktpsindhu@gmail.com • RNI NO : MAHMAR/2006/17326 • किंमत १ •

ऐकत रहा
FM 90.4

# 'बोलीभाषांविषयी सार्वत्रिक सन्मान निर्माण होण्याची गरज'

कोल्हापूर/प्रतिनिधी :

बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सार्वत्रिक सद्भाव आणि सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर' या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये उमटला.

महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत 'बोलींचा जागर' ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा आणि चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण झाले.

मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे आणि डॉ. एकनाथ आळवेकर या तज्ज्ञांनी सहभाग दर्शविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

यावेळी 'चंदगडी बोली: उद्गम आणि विकास' या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो आणि त्यातूनच पुढे भाषिक सपाटीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. या पेरलेल्या न्यूनगंडातून आजवर अनेक बोलीभाषा अस्तंगत झाल्या, तथापि आता त्यांच्या जतनासाठी शासनाने पुढाकार घेतला, ही स्वागतार्ह बाब आहे. बोलीभाषा ही आपल्या अस्तित्वाचे कारण आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर होऊन बोलीभाषेविषयी प्रेम, आदर आणि सद्भाव जागृत करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्या दृष्टीने ज्या त्या भागातील बोलीभाषेविषयी त्या भागात संबंधित बोलीभाषेचा उत्सव साजरा केला जावा. त्यासाठी शासन आणि विद्यापीठांनी संयुक्तपणे कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

'चंदगडी बोलीचे स्वरूप' या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. चंदगडी माणूस हा निर्मळ, स्वाभिमानी आणि सडेतोड स्वभावाचा असल्यामुळे स्वाभाविकच त्याची भाषा ही राकट आहे. या भाषेत लिंगभेद आढळत नाही. प्रत्येक तिथी, सण, उत्सव यांचे लोकगीतांतून मोठे सादरीकरण होते. आता नव्या पिढीमध्ये हे सारे अस्तंगत होताना दिसते. जर ही बोलीभाषा टिकवायची तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. एकनाथ आळवेकर 'कोल्हापुरी बोली' या विषयावर बोलताना म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकच्या सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ही बोलली जाते. इथला भूमिपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते. एकाचवेळी रांगडा लवंगी मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा हे त्याच्या भाषेचे वैशिष्ट्य आहे. शंकर पाटील, महादेव मोरे, डॉ. आनंद यादव, डॉ. राजन गवस, डॉ. चंद्रकुमार नलगे, कृष्णात खोत आणि किरण गुरव इत्यादी लेखकांच्या साहित्यामधून कोल्हापुरी बोली निरनिराळ्या ढंगाने वाचकांना सामोरी येते. उच्चारणातील आक्रमकता, शिव्यांच्या बोलण्यातील क्रियापदांचा वापर आणि कृषीसंस्कृतीचा स्वाभाविक प्रभाव ही या बोलीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्याचप्रमाणे रोजच्या भाषेमध्ये इंग्रजी शब्दांचे सुलभीकरण करून त्यांचा सहजपणाने नित्य बोलण्यात केला जाणारा वापर हेही कोल्हापुरी बोलीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते.



सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणांतून कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींमधील शब्द, वाक्प्रचार आणि म्हणींची अनेक उदाहरणे देऊन ही माहिती रंजकतेने सादर केली.

यावेळी मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील बोली भाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी बोलीभाषा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्याचप्रमाणे विविध बोलीभाषांचे शब्दकोश निर्माण करण्याच्या दृष्टीनेही शासन गांभीर्यपूर्वक प्रयत्न करीत आहे. नवतंत्रज्ञानाचा, समाजमाध्यमांचा वापर करून नव्या पिढीने आपल्या बोली भाषेला लोकमान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, बोलीभाषा ही आपली खरी मातृभाषा आहे, हे लक्षात घेऊन आपण तिचा सन्मान करण्यास शिकले पाहिजे. भाषा हे लोकांमध्ये जवळीक साधण्यासाठीचे महत्त्वाचे साधन आहे. भाषा प्रवाही राहण्यासाठी अन्य भाषांतील शब्दांचा मुक्तप्रवेश आपण स्वीकारला पाहिजे. बोलीभाषांचे शब्दकोश निर्माण होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

चंदगडी लोककलाकारांचे अवर्णनीय सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी (ता. चंदगड) येथील तुळसाबाई वाडिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. विशेषतः चंदगड भागातील विवाहादरम्यान जे विविध विधी केले जातात, त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या विविध लोकगीतांचे सादरीकरण करण्यात आले. या कलाकारांत सविता विष्णू गावडे, सुनिता गोविंद पाटणकर, सुंदराबाई बाबू गावडे, शांता महादेव वाडिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनिता गावडे आणि शांता दत्तू गावडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमास मराठी भाषा विभागाचे भाषा अधिकारी अजित पोवार, वरिष्ठ अनुवादक मुकुंद मोरे, अधीक्षक नारायण जाधव, नितीन [illegible], डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2026

तरुण भारत

# बोलीभाषेचा सार्वत्रिक सन्मान होणे गरजेचे

## शिवाजी विद्यापीठातील 'बोलींचा जागर' कार्यशाळेत मान्यवरांचा सूर

- कोल्हापुरी, चंदगडीसह विविध बोलीभाषांचे उलगडले विविध पैलू

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर" या एकदिवसीय कार्यशाळेतून उमटला.

राज्य शासनाच्या भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत आयोजित 'बोलींचा जागर'कार्यशाळेत मान्यवरांनी भाषेचे विविध पैलू उलगडले. कार्यशाळेत कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींच्या अनुषंगाने चर्चा आणि चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण झाले.

मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित


डॉ. एकनाथ आळवेकर


डॉ. गोपाळ गावडे


नंदकुमार मोरे


डॉ. संजय पवार

या उपक्रमात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे आणि डॉ. एकनाथ आळवेकर यांनी सहभाग दर्शविला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

चंदगडी बोली : उगम आणि विकास या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो. बोलीभाषा ही आपल्या अस्तित्वाचे कारण आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे.

'चंदगडी बोलीचे स्वरूप" या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. चंदगडी माणूस हा निर्मळ, स्वाभिमानी आणि सडेतोड स्वभावाचा असल्यामुळे स्वाभाविकच त्याची भाषा ही राकट आहे. या भाषेत लिंगभेद आढळत नाही. प्रत्येक विधी, सण, उत्सव यांचे लोकगीतांतून मोठे साजरीकरण होते. जर ही बोलीभाषा टिकवावयाची तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. एकनाथ आळवेकर 'कोल्हापुरी बोली" या विषयावर बोलताना म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकचा सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ती बोलली जाते. इथला भूमीपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते.

### चंदगडी लोककलाकारांचे श्रवणीय सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी येथील तुळसाबाई बांदिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. यामध्ये सरिता विष्णू गावडे, सुनिता गोविंद भादवणकर, गुंडाबाई बाळू गावडे, शांता महादेव बांदिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनिता गावडे आणि शांता दत्तू गावडे यांचा समावेश होता.

डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अजित पोवार, मुकुंद गोरे, अधीक्षक नारायण जायभाये, नितीन यशवंतराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर उपस्थित होते..

2 2 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्यूज

वामाक्षी
Boutique
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nandi Corner Apartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# बोलीभाषांविषयी सार्वत्रिक सद्भाव निर्माण होण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठातील 'बोलींचा जागर' कार्यशाळेतील सूर



कोल्हापूर, (महा न्यूज अँड व्ह्यूज) :

बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सार्वत्रिक सद्भाव आणि सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर' या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये उमटला.

महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत 'बोलींचा जागर' ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत कोल्हापुरी आणि चंदगडी बोलीच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा आणि चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण झाले.

मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे आणि डॉ. एकनाथ आळवेकर या तज्ज्ञांनी सहभाग दर्शविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

यावेळी 'चंदगडी बोली: उद्गम आणि विकास' या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो आणि त्यातूनच पुढे भाषिक सपाटीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. या पेरलेल्या न्यूनगंडातून आजवर अनेक बोलीभाषा अस्तंगत झाल्या, तथापि आता त्यांच्या जतनासाठी शासनाने पुढाकार घेतला, ही स्वागतार्ह बाब आहे. बोलीभाषा ही आपल्या अस्तित्वाचे कारण आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर होऊन बोलीभाषेविषयी, प्रेम, आदर आणि सद्भाव जागृत करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्या दृष्टीने ज्या त्या भागातील बोलीभाषेविषयी त्या भागात संबंधित बोलीभाषेचा उत्सव साजरा केला जावा. त्यासाठी शासन आणि विद्यापीठांनी संयुक्तपणे कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

'चंदगडी बोलीचे स्वरूप' या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. चंदगडी माणूस हा निर्मळ, स्वाभिमानी आणि सडेतोड स्वभावाचा असल्यामुळे स्वाभाविकच त्याची भाषा ही रांगडी आहे. या भाषेत लिंगभेद आढळत नाही. प्रत्येक विधी, सण, उत्सव यांचे लोकगीतांतून मोठे सादरीकरण होते. आता नव्या पिढीमध्ये हे सारे अस्तंगत होताना दिसते. जर ही बोलीभाषा टिकवायवयाची तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. एकनाथ आळवेकर 'कोल्हापुरी बोली' या विषयावर बोलताना म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकच्या सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ही बोलली जाते. इथला भूमीपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते. एकाचवेळी रांगडा लवंगी मिरचीसारखा तिखट शिवराळपणा आणि गुळासारखा गोडवा हे त्याच्या भाषेचे वैशिष्ट्य आहे. शंकर पाटील, महादेव मोरे, डॉ. आनंद यादव, डॉ. राजन गवस, डॉ. चंद्रकुमार नलगे, कृष्णात खोत आणि किरण गुरव इत्यादी लेखकांच्या साहित्यामधून कोल्हापुरी बोली विविधाळ्या ढंगाने वाचकांना भावली येते. उच्चारणातील आक्रमकता, स्त्रियांच्या बोलण्यातील क्रियापदांचा वापर आणि कृषीसंस्कृतीचा स्वाभाविक प्रभाव ही या बोलीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्याचप्रमाणे शहरी भागामध्ये इंग्रजी शब्दांचे मुलाभीकरण करून त्यांचा सहजगत्या नित्य बोलण्यात केला जाणारा वापर हेही कोल्हापुरी बोलीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते.

सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणांतून कोल्हापुरी आणि चंदगडी बोलीमधील शब्द, वाक्प्रचार आणि म्हणींची अनेक उदाहरणे देऊन ही माहिती रंजकरीत्या सादर केली.

यावेळी मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील बोली भाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी बोलीभाषा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्याचप्रमाणे विविध बोलीभाषांचे शब्दकोश निर्माण करण्याच्या दृष्टीनेही शासन गांभीर्यपूर्वक प्रयत्न करीत आहे. नवतंत्रज्ञानाचा, समाजमाध्यमांचा वापर करून नव्या पिढीने आपल्या बोली भाषेला लोकमान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, बोलीभाषा ही आपली खरी मातृभाषा आहे, हे लक्षात घेऊन आपण तिचा सन्मान करण्यास शिकले पाहिजे. भाषा हे लोकांमध्ये जवळीक साधण्यासाठीचे महत्त्वाचे साधन आहे. भाषा प्रवाही राहण्यासाठी अन्य भाषांतील शब्दांचा मुक्तप्रवेश आपण स्वीकारला पाहिजे. बोलीभाषांचे शब्दकोश निर्माण होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

### चंदगडी लोककलाकारांचे अभिनव सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी (ता. चंदगड) येथील तुळसाबाई बांदिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. विशेषतः चंदगड भागातील विवाहादरम्यान जे विविध विधी केले जातात, त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या विविध लोकगीतांचे सादरीकरण करण्यात आले. या कलाकारांत सरिता विष्णू गावडे, सुनिता गोविंद भादवणकर, गुंडाबाई बाळू गावडे, शांता महादेव बांदिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनिता गावडे आणि शांता दत्तू गावडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमास मराठी भाषा विभागाचे भाषा अधिकारी अजित पोवार, वरिष्ठ अनुवादक मुकुंद गोरे, अधीक्षक नारायण जाधवांचे, नितीन पवळकराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.